RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक १०(४)] शुक्रवार, जानेवारी २२, २०२१/माघ २, शके १९४२ [पृष्ठे ९, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३१

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृहनिर्माण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जानेवारी, २०२१

**अधिसूचना**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "**लेखापाल**" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असेः—

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास **प्राधिकरणातील लेखापाल** (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र अधि. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "विभाग" याचा अर्थ शासनाचा गृहनिर्माण विभाग.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "लेखापाल" या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल–

(क) प्राधिकरणामधील लिपिक/लिपिक-टंकलेखक संवर्गातील ज्या व्यक्तींनी विभागीय लेखापाल या पदासाठी आवश्यक असलेली महालेखापाल कार्यालयाकडून घेण्यात येणारी श्रेणी-२ ची परिक्षा उत्तीर्ण केली असेल, अशा व्यक्तींमधून पात्रता व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन;

**किंवा**

(ख) भारत सरकार, महाराष्ट्र शासन किंवा इतर स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील तसेच महालेखापाल कार्यालयाकडून घेण्यात येणारी विभागीय लेखापाल पदासाठीची परिक्षा उत्तिर्ण केलेल्या व्यक्तींमधून किंवा म्हाडातील लेखापाल या पदाला समकक्ष पदावर कार्यरत व्यक्तींमधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार प्रतिनियुक्तीने.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ९० : १० असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परिक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही मंडळात/ कार्यालयात , बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा.कों.धनावडे,**

शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जानेवारी, २०२१

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "**सहाय्यक लेखाधिकारी**" या पदावरील सेवाप्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे:—

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील **सहाय्यक लेखाधिकारी,** (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "विभाग" याचा अर्थ शासनाचा गृहनिर्माण विभाग.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "**सहाय्यक लेखाधिकारी**" या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(क) प्राधिकरणामधील लेखापाल संवर्गातील नियमित सेवेचा तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या वर्षांचा अनुभव असलेल्या व्यक्तींमधुन पात्रता व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन;

**किंवा**

(ख) राज्य शासनाच्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवापरिक्षा-३ ही अर्हता धारण करणा-या शासकीय कर्मचाऱ्यांमधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रक/आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार प्रतिनियुक्तीने.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ९०:१० असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागिय परिक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परिक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही मंडळात/कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा.कों.धनावडे,**
शासनाचे उप सचिव

**गृहनिर्माण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जानेवारी. २०२१

**अधिसूचना**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) याच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"लेखाधिकारी"** या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असेः-

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील लेखाधिकारी (वर्ग-१) (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "विभाग" याचा अर्थ शासनाचा गृहनिर्माण विभाग.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "लेखाधिकारी" या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :-

(क) प्राधिकरणामधील सहाय्यक लेखाधिकारी संवर्गातील नियमित सेवेचा तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या वर्षांचा अनुभव असलेल्या व्यक्तींमधून पात्रता व जेष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन ;

किंवा

(ख) संचालक, लेखा व कोषागारे यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (गट-अ कनिष्ठ) या पदावर किमान तीन वर्षे सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रक/आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार प्रतिनियुक्तीने.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ७५:२५ असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही मंडळात/कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जानेवारी २०२१

## अधिसूचना

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) याच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "**मुख्य लेखाधिकारी**" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असेः-

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील मुख्य लेखाधिकारी (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील "**मुख्य लेखाधिकारी**" या पदावरील नियुक्ती, प्राधिकरणातील लेखाधिकारी हे पद धारण करणाऱ्या ज्या व्यक्तीला त्या पदावरील नियमित सेवेचा तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या वर्षांचा अनुभव असेल, अशा व्यक्तींमधून पात्रता व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन करण्यात येईल.

४. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

**गृहनिर्माण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जानेवारी २०२१

**अधिसूचना**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९३/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. २८) याच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "**वित्त नियंत्रक**" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असेः—

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील **वित्त नियंत्रक** (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "विभाग" याचा अर्थ शासनाचा गृहनिर्माण विभाग.

३. प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील वित्तीय सेवेतील "**वित्त नियंत्रक**" या पदावरील नियुक्ती, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहसंचालक या पदावर कार्यरत व्यक्तींमधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रक/आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार प्रतिनियुक्तीने करण्यात येईल.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.